**CNR NO-MHSO060010352023**

**नियमित दिवाणी दावा क्र. २३४/२०२३**

**शंकर सुरवसे.**

**वि.**

**कांचन कुंभार व इतर.**

## नि. क्र. २४ वरील आदेश
## (घोषित दि. २४/०१/२०२५)

०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ तर्फे दाखल करण्यात आलेला असून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापीत करुन झालेला 'दावा विना कैफियत' चालविण्याचा आदेश रद्द करुन दाखल केलेली कैफियत स्वीकारण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] वादीतर्फे सदर अर्जास प्रखर विरोध करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करणे झाल्यास रक्कम रु.१०,०००/– खर्च लावण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] प्रस्तुतचा दावा हा करारपूर्तता होवून मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला असून प्रतिवादी क्र. २ दि.१६/०१/२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले परंतु त्यांनी विहित मुदतीत आपली कैफियत सादर केलेली नाही. प्रतिवादी क्र. २ तर्फे असे नमुद करण्यात आले की, ते अशिक्षित असून वादीने त्यांना आपसात तडजोड करण्याबाबत तोंडी सांगितल्यामुळे त्यांनी आपली कैफियत दाखल केली नाही. निश्चितपणे प्रतिवादी अशिक्षीत आहे किंवा उभयपक्षांची न्यायालया बाहेर तडजोडीची बोलणी सुरु होती ही कारणे कैफियत विलंबाने दाखल करण्याची कारणे असू शकत नाही. असे जरी असले तरीही प्रस्तुत आर्जचे स्वरुप तथा प्रतिवादी क्र. २ यांचे गुंतलेले मौलिक हक्क तथा दावा गुणदोषांवर न्यायनिर्णित करणे कामी प्रतिवादी क्र. २ यांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळणे नैसर्गिक न्याय तत्वानुसार आवश्यक असून त्याकरीता त्यांची कैफियत पटलावर असणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.१ हे समन्स तामील होवूनही न्यायालयात हजर झालेले नसल्यामुळे दावा प्रतिवादी क्र.१ विरुध्द

एकतर्फा चालविण्याबाबतचा आदेश पारीत झालेला आहे. अश्या परिस्थीतीत मुळ दावा गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता प्रतिवादी क्र.२ विरुध्द झालेला 'दावा विना कैफियत' चालविण्याचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करणे योग्य असल्याचे माझे मत झालेले आहे. प्रतिवादीने केलेल्या विलंबामुळे वादीस नुकसानभरपाई रक्कम रु.२०००/– मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] अर्ज रक्कम रु. २,०००/– मंजूर करण्यात येतो.

२] प्रतिवादी क्र.२ यांचे विरुध्द झालेला 'दावा विना कैफियत' चालविण्या आदेश रद्द करण्यात येतो. प्रतिवादी क्र. २ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापीत करण्यात येतो. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर त्यांनी दाखल केलेली कैफियत पटलावर घेण्यात यावी.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2025.01.01 12:34:16 +0600

**दि. २४/०१/२०२५.**

**(अमित अ.खंडाळे)**
**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपुर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 24.01.2025 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 24.01.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 24.01.2025 |